# ''अखंड ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले''

डॉ. अर्जुन डी. म्हाळुंगेकर इतिहास विभाग प्रमुख,डी.के.ए.एस्.सी. कॉलेज,इचलकरंजी.

---

**प्रस्तावना :-**

हजारो वर्षापासून भारतात वेद, पुराणे स्मृत्या आणि सामाजिक चातुर्वर्ण्यप्रणीत समाज व्यवस्था निर्माण केली होती. अशा विषम समाज रचनेमुळे प्राचीन काळापासून भारतात जातिव्यवस्था अस्तित्वात होती. या व्यवस्थेमधून वर्गकलह व वर्गकलहातून स्वत:च्या जातीच्या वर्चस्वाची भावना वाढीला लागली. यातून जाती–जातीमध्ये संघर्ष निर्माण होत गेले. या जातीकलहामध्ये जेत्यांनी पराजीतांवर विविध बंधने लादली. त्यामुळेच पराभूत वर्ग लाचार व निराश्रीत बनला. या व्यवस्थेमूळे त्रिवर्णीकांना विशेषाधिकार तर शुद्रांच्या वाट्याला या चित्रवर्णीकांची सेवा चाकरी करावी लागली.[१] यातूनच अस्पृश्येचा जन्म झाला. चातुर्वर्ण्याचे समर्थन करणाऱ्या मनुस्मृतीने स्त्रियांच्यावर कडक बंधने लादली. स्त्रिचे स्वातंत्र्य व मानसन्मान हिरावून घेवून तिला गुलाम बनविले.[२] वर्णवर्चस्वाच्या समाजव्यवस्थेमुळे हा समाज विषमतेचा महाभांडार बनला. या विषमतेविरूध्द गौतम बुध्दांनी प्रथम लढा दिला. तेंव्हा कुठे स्त्रियांना पुरुषांच्या बरोबर हक्क प्राप्त झाले. म्हणूनच स्त्रि–स्वातंत्र्याचे व स्त्रि–मुक्तीचे आद्य प्रणेत भगवान गौतम बुद्ध होय.[३] त्यानंतर गौतम बुध्दांची परंपरा संत कबीर, संत तुकाराम, संत एकनाथ, चोखामेळा याबरोबरच आधुनिक भारतात सामाजिक परिवर्तनाची मशाल सामर्थपणे प्रज्वलीत ठेवणारे महात्मा जोतीबा व त्यांची अर्धांगीणी सावित्रीबाई यांनी स्त्रि शिक्षणाचे पवित्र कार्ये हाती घेतले म्हणजेच महात्मा फुले यांनी आपल्या अर्धांगिनीसह प्रवाहाविरूध्द पोहायला सुरूवात केली.

३ जानेवारी १८३१ मध्ये सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील 'नायगाव' सारख्या ग्रामीण भागात सावित्रीचा जन्म झाला. त्यापूर्वीच १८ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे जोतिबा फुले यांचा जन्म झाला. पुढे सन १८४१ मध्ये सावित्रीबाई व जोतिबा फुले यांचा विवाह झाला. सावित्रीबाईंचे वडील खंडोजी पाटील (नेवासे) हे नायगावचे पाटील होते.[४] गावात त्यांची पाटीलकी होती. याच घराण्यात जन्मलेली सावित्री लहानपणापासून बुध्दीने तल्लक, प्रकृतीने सुदृढ, आवाजाने खणखणीत, स्वभावाने स्वाभिमानी, धाडशी वृत्तीने झुंजार होत्या. तद्कालीन समाजव्यवस्थेतील विषमता, दृष्ट रूढी व परंपराविषयी त्यांच्या मनात चिड होती. विवाहनंतर त्यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करून सावित्रीबाई जोतिबांच्या ज्ञानसभेच्या चळवळीची खऱ्या शिल्पकार ठरल्या आणि अखेरच्या क्षणापर्यंत शिक्षणाचे व्रत स्विकारून आपल्या ध्येयाची वाटचाल सुरू केली. जोतिबा एकवीस वर्षाचे असतानाच त्यांनी स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करण्याचा विडा उचलला. समाजातील उच्चवर्णींयानी स्त्रियांना आणि शुद्रांना शिक्षणापासून वंचित ठेवले होते. त्यामुळे त्यांची प्रगती खुंटली होती, त्यावर उपाय म्हणजे शिक्षण होय. म्हणूनच त्यांनी स्त्री व शूद्रांना ज्ञानाचे दरवाजे खुले करावयाचा ठाम निर्धार हाती घेतला होता. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उध्दारी' ह्या सत्याचा प्रत्यय त्यांना आला होता. या विचारांनी मुलींच्या करिता शाळा सुरू करण्याचे तयांनी ठरविले, त्यानुसार जोतिबांनी १ जानेवारी १८४८ मध्ये पुणे येथे मुलींची शाळा सुरू केली.[५] त्याकाळात पुणे हा सनातन्यांचा बालेकिल्ला होता. अशा सनातन्यांच्या बालेकिल्ल्यात स्त्री शिक्षणाची तोफ डागून नव्या इतिहासाची रचना केली. सर्व जगाच्या दृष्टीने १८४८ हे वर्ष महान क्रांतिकारक वर्ष ठरलं. याच वर्षात कार्ल मार्क्स यांने 'कम्युनिस्टांचा जाहीरनामा' हा ऐतिहासिक महत्त्वाचा प्रबंध प्रसिद्ध केला. याचवर्षी स्त्रि उध्दाराच्या कार्याची अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरातील वेल्सियन चर्च येथे स्थापना केली होती. तिकडे अमेरिकेतील स्त्रियांमध्ये क्रांती घडून येत असता इकडे भारतीय स्त्री मात्र गुलामगिरीच्या बंधनात खितपत पडली होती. हिंदुशास्त्राच्या आज्ञेप्रमाणे स्त्रिला कनिष्ठ दर्जा देण्यात आला होता. तिच्यावर विविध बंधने लादली होती. अशा कठिण प्रसंगी सावित्रीबाईंनी येथील स्त्रियांच्या गुलामी प्रथेविरूध्द आवाज उठवून विधायक कार्यास प्रारंभ केला.[६] हा एक योगायोगच मानला जातो. त्या भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका होय. सावित्रीबाईंनी हाती घेतलेले कार्ये म्हणजे जोतिबांची पत्नी म्हणून केलेले नाही, तर त्यांची तशी स्वत:ची आत्मप्रेरणाच होती. जर काय शिक्षण कार्यात जोतिबांना पत्नीची साथ मिळाली नसती तर त्यांनी हाती घेतलेल्या कार्यास पुढे काही काळ विलंब लागला असता, पण तसे न घडता कणखर अशा सावित्रीबाई यांनी वेळोवेळी अपार कष्ट घेवून, समाजातील धर्ममार्तंडाकडून होणारा अपमान सहन करत पतिने हाती घेतलेल्या पवित्र कार्याशी त्या एकनिष्ठ राहिल्या.

फुले दाम्पत्यांनी पुणे येथे मुलींची शाळा सुरू केली. त्यावेळी शाळेत मुलींना शिकविण्यासाठी त्यांना शिक्षक मिळू शकत नव्हता. म्हणून त्यांनी मुलींच्या शाळेत शिक्षिका म्हणून सावित्रीबाईंची नेमणूक केली. पण एका स्त्रीने तद्कालीन समाजातील परंपरागत चालत आलेली बंधने मोडून शिक्षिकेचे काम करावे हे सनातनवादी वृत्तीच्या लोकांना आवडले नाही. पण सावित्रीबाईंनी सनातन्यांच्या बेफाम विरोधाला घाबरून त्या खचल्या नाहीत. तर त्यांनी सनातन्यांच्या या कोल्हेकुईला मुळीच भिक घातली

नाही उलट आपल्या कार्याची दिशा योग्य आहे याची त्यांना खात्री पटलेली होती. कित्येक वर्षापूर्वी मनुसारख्या धर्मव्यवस्थेने स्त्रीच्या पायात ठोकलेल्या बेड्या सावित्रीबाईंने पतिच्या मदतीने तोडून टाकल्या. त्यांनी केलेल्या स्त्री उद्धाराच्या कार्यास भारताच्या इतिहासात तोड नाही. सावित्रीबाई या समाजपरिवर्तनाच्या कार्यात त्या केवळ जोतिबांची सावली म्हणून राहिल्या नाहीत. त्यांचे व्यक्तिमत्व जोतिबांच्या व्यक्तीमत्वाशी संवादि असले तरी स्वतंत्र होते, त्यांनी आपले विचार डोळसपणे गृहण केले होते. तसेच त्यांची तत्वप्रणाली त्यांनी आत्मसात केली होती. सनातनी लोकांनी हाती घेतलेल्या कार्यात कितीही अडथळे आणले तरी आपल्याच तत्त्वांचा विजय होणार ह्याबद्दल त्यांना शंका नव्हती. त्यांनी १०/१०/१८५६ रोजी माहेरहून जोतिबांना पाठविलेल्या पत्रात त्या म्हणतात– ''पुण्यात आपल्याविषयी दुष्टावा माजविणारे विदूषक (लोक) पुष्कळ आहेत. त्यांना भिवून आपण हाती घेतलेले कार्ये का सोडून घ्यावे ? सदासर्वदा कामात गुंतावे, भविष्यातले यश आपलेच आहे, असा आशावाद प्रकट केला आहे.[७]

सावित्रीबाईंच्या कर्तृत्वास सुरूवात झाली ती त्यांच्या विवाहानंतरच. महात्मा फुले जसे समाजाचे महान गुरु होते. तसेच ते सावित्रीबाईंचे आदर्श पति व गुरु होते. त्या जोतिबांच्या अर्धांगी होत्या. त्यांच्या कामगिरीमुळे स्त्रियाचा उध्दार होण्यास हातभार लागला.[८] त्यांनी स्वत:चा संसार, घरदार या ऐहिक सुखाला ठोकरून आपल्या आदर्श पतिबरोबर जगाचा संसार पत्करला. सावित्रीबाईंच्या या कामगिरीमुळे स्त्रीला नवी दृष्टी मिळाली. तिला आपल्यातील अज्ञानाची जाणीव झाली व आपले पिढ्यानपिढ्या गमावलेले अधिकार परत मिळविण्यास तयार झाली. हे केवळ फुले दांम्पत्यांमुळेच. म्हणूनच परमानंद म्हणतात– ''जोतिबा पेक्षा त्यांची पत्नी सावित्रीचे कौतुक करावे तेवढे थोडेच होईल. तिची योग्यता काय सांगावी ? आपल्या पतिला तिने आयुष्यभर सहकार्य केले व त्यांच्याबरोबर राहून आपल्या वाट्याला येतील त्या हालअपेष्टा भोगिल्या.''[९] सारांश पुण्याच्या बालेकिल्ल्यात राहून तेथे मुलींच्या शाळा सुरू करणे म्हणजे सिंहाच्या गुहेत प्रवेश करून त्याची आयाळ पकडण्यासारखेच होते. खरे तर आजच्या तरुण पिढीने क्रांतीज्योति सावित्रीबाईच्या स्त्री उध्दाराच्या कार्याच्या इतिहासाचे परिपूर्ण लिखाण व त्यांच्या कार्याचा प्रसार केला तरच आजच्या तरुण पिढीला त्यांचे कर्तृत्व समजेल. जशी सावित्रीबाई जोतिबांची ज्योत होवून सतत तेवत राहिली, स्वत:च्या स्वतंत्र, अखंड ज्ञानज्योतीने संपूर्ण भारतीय महिलांना तिने ज्ञानाचा प्रकाश दिला. अशा या थोर फुले दांम्पत्यांच्या कार्याचा प्रसार करण्यासाठी आपण सर्वानीच कटीबद्ध झाले पाहिजे.

**संदर्भ –**


१) नलवडे, म. दा. (संपा.); 'अस्पृश्यांचे आर्थिक जीवन', भाग १ ला, युवराज प्रकाशन, पुणे, १९९७, पृ. २

२) ठोंबरे, तानाजी; 'महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्ये', लोकवाङमय गृह, मुंबई, मार्च १९९१, पृ. ८

३) साळुंखे आ. ह.; (लेख), पाक्षिक, मुळ निवासी संघर्ष, पुणे – २०००, पृ. ९

४) जोशी, द. दा.; 'महात्मा जोतिबा फुले', सुरेश एजन्सी, पुणे १९८३, पृ. २८

५) नरके, हरी, य. दि. फडके (संपा.); 'महात्मा फुले गौरव ग्रंथ', खंड पहिला, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन, मुंबई, १९८२, पृ. ४२६

६) अ) कीर धनंजय; 'महात्मा जोतिराव फुले : आमच्या समाज क्रांतीचे जनक', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १८८९, पृ. २३

ब)ठोंबरे तानाजी; उपरोक्त, पृ. ७

७) हरि नरके, फडके य. दि.; उपरोक्त, पृ. ८४, ८५

८) हरि नरके, फडके य. दि.; उपरोक्त, पृ. ४२५

९) हरि नरके, फडके य. दि.; उपरोक्त, पृ. ४४६